

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर




ई मासिक **विद्यासंवाद**

सप्टेंबर २०२३|आवृत्ती-०३अ

# शताब्दी महोत्सव पुरस्कार वितरण व शिक्षक दिन विशेषांक




विद्येअंगी व्हावा विनय। विद्या करी स्वतंत्र, निर्भय। शिक्षणाने वाढावा निश्चय। जीवन-जय करावया।।

ई मासिक विद्यासंवाद
शताब्दी महोत्सव विशेषांक

सप्टेंबर २०२३ | आवृत्ती-०३अ

मार्गदर्शक
**डॉ. सुभाष चौधरी**
कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**डॉ. संजय दुधे**
प्र-कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

प्रकाशक
**डॉ. राजू हिवसे**
कुलसचिव
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

संपादक
**श्री. प्रेमदास वाडकर**
जनसंपर्क अधिकारी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

मुद्रक
**श्री. प्रवीण गोतमारे**
प्रकाशन अधिकारी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर



मा. राज्यपाल
**श्री. रमेश बैस**



मा. कुलगुरु
**डॉ. सुभाष चौधरी**



मा. प्र-कुलगुरु
**डॉ. संजय दुधे**



मा. कुलसचिव
**डॉ. राजू हिवसे**

# विकसित भारतासाठी विद्यापीठांना जागतिक दर्जाची ज्ञानकेंद्रे बनवूया - माननीय राज्यपाल श्री. रमेश बैस

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शिक्षक दिनानिमित्त शताब्दी महोत्सव पुरस्कारांचे वितरण







देशातील युवा पिढीला २१ व्या शतकातील जागतिक स्पर्धेसाठी तयार करण्याची गरज आहे. यासोबतच सर्वच क्षेत्रात अग्रेसर होत २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र म्हणून जगापुढे उभे राहायचे आहे. त्यासाठी विद्यापीठांमधून जागतिक दर्जाचे गुणवत्तापूर्ण शिक्षण देत भारताला वैश्विक ज्ञान केंद्र बनविण्याचे आवाहन माननीय राज्यपाल श्री. रमेश बैस यांनी सोमवार, दिनांक ४ सप्टेंबर २०२३ रोजी केले. सिव्हिल लाईन्स येथील डॉ. वसंतराव देशपांडे स्मृती सभागृहात आयोजित समारंभात राज्यपाल तथा विद्यापीठांचे कुलपती रमेश बैस यांच्या हस्ते शिक्षक दिनानिमित्त विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यावेळी आपल्या अध्यक्षीय भाषणात ते बोलत होते.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती विकास सिरपूरकर यांची विशेष उपस्थिती होती. यावेळी कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्यासह विविध विभागांचे अधिष्ठाता, विभाग प्रमुख, प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पुरस्कारार्थींचे कुटुंबीय उपस्थित होते. राज्यपालांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जीवन साधना पुरस्कार, आदर्श शिक्षण संस्था पुरस्कार, डॉ. आर. कृष्णकुमार सुवर्णपदक, प्राचार्य श्री. बलराज अहेर स्मृती सुवर्णपदक, शताब्दी महोत्सव सुवर्णपदक आदी विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. विद्यापीठाच्या जमिनीवरील अतिक्रमण हटविण्यास मदत केलेल्या शासकीय अधिकाऱ्यांचा देखील यावेळी सत्कार करण्यात आला तसेच विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन वार्षिकांक स्पर्धेचे पुरस्कार वितरित करण्यात आले.

भारताच्या गतकाळातील वैभवाचा संदर्भ देत राज्यपाल श्री. बैस म्हणाले की, एकेकाळी भारत हा जगातील सर्वच क्षेत्रात आघाडीवर असलेला देश होता. जगभरातील लेखक आणि इतिहासकारांनी देशाच्या प्रगतीचा गुणगौरव आपल्या ग्रंथांमध्ये केल्याचे वाचावयास मिळते. सूती कापड, रेशीम, लिलन, वास्तूकला अशा विविधांगी क्षेत्रात आपल्या देश आघाडीवर होता. युरोप किंवा आशिया खंडातील अन्य राष्ट्रांच्या तुलनेत भारत हा उद्योग आणि निर्मिती क्षेत्रात आघाडीवर असल्याचे पहायला मिळाले आहे. गतकाळातील हे वैभव पुन्हा प्राप्त करायचे झाल्यास दर्जेदार शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. यासाठी शैक्षणिक गुणवत्ता ही जागतिक दर्जाची राखण्याची गरज असल्याचे सांगत राज्यपालांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील शिक्षणाचे महत्व यावेळी अधोरेखित केले. जगभरातील विविध विद्यापीठांमध्ये गुणवत्तापूर्ण अभ्यासक्रम आणि विविध शिष्यवृत्या दिल्या जातात. जगभरातील विद्यार्थ्यांना आकर्षित करण्याकरिता विद्यापीठे आणि शैक्षणिक संस्थांनी ही विद्यार्थी केंद्रीत धोरण आखण्याची गरज असल्याचे राज्यपाल श्री. बैस पुढे म्हणाले. 'आर्टिफिशिअल इंटेलिजन्स' या तंत्रज्ञानाविषयी बोलताना राज्यपाल म्हणाले की, राज्यातील सर्वच विद्यापीठांमध्ये एआय तंत्रज्ञानाची माहिती तसेच तज्ज्ञांचे मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात येण्याची गरज आहे. 'एआय' तंत्रज्ञानाचा विद्यार्थ्यांनी सदुपयोग करणे तसेच विद्यापीठ प्रशासनाने प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत हे तंत्रज्ञान पोहोचण्याची गरज असल्याचे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी विद्यापीठाची गेल्या शंभर वर्षातील वाटचाल आणि शताब्दी महोत्सवाच्या निमित्ताने गेल्या वर्षभरात राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. विद्यापीठाकडून राबविल्या जात असलेल्या 'रीच टू अनरीच्ड' अभियानाबाबत त्यांनी माहिती दिली. विद्यापीठाला ५० वर्षे पूर्ण झाले तेव्हा इंडियन सायन्स काँग्रेस तसेच शंभरव्या वर्षात देखील इंडियन सायन्स काँग्रेसचे आयोजन विद्यापीठाने केल्याचे त्यांनी सांगितले. विद्यापीठाला नॅकचा अ प्लस दर्जा, एलआयटीला प्रथमच नॅक, एनबीए दर्जा मिळवून दिला. विद्यापीठ अनुदान आयोगाने एलआयटीला स्वायत्तता प्रदान केली आहे.

एलआयटी आता स्वतंत्र विद्यापीठ झाल्याचे त्यांनी सांगितले. सागर, जबलपूर, अमरावती, गोंडवाना आणि आता एलआयटी असे ५ स्वतंत्र विद्यापीठ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातून तयार झाले आहे. विद्यापीठाने क्रीडा क्षेत्रात देखील भरीव कामगिरी केली आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचा सिंथेटिक ट्रॅक तयार असून भविष्यात मल्टी लेवल मल्टी स्पोर्ट कॉम्प्लेक्स तयार होत असल्याचे कुलगुरू म्हणाले. माजी न्या. विकास सिरपूरकर यांनीही यावेळी आपले विचार केले. जीवन साधना पुरस्कार देत गुणांची जाण असल्याचे हे पुरस्कार देत विद्यापीठाने दाखवून दिले आहे. पुरस्कारार्थींचे अभिनंदन करीत भविष्यात अधिक जोमाने काम करण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अमृता इंदूरकर आणि डॉ. वर्षा देशपांडे यांनी केले तर आभार प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी मानले.

## पुरस्कारार्थींची यादी

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जीवन साधना पुरस्कार**
१) डॉ. एच.एफ. दागीनावाला, नागपूर,
२) श्री. हरिश्चंद्र बोरकर, भंडारा
३) प्रा. श्री. सुरेश देशमुख, वर्धा,
४) श्री. शिवकिसन अग्रवाल, नागपूर,
५) डॉ. निरूपमा देशपांडे, अमरावती

**शिक्षण संस्था पुरस्कार**
- श्री. नागपूर गुजराती मंडळ, नागपूर.

**डॉ. आर. कृष्णकुमार सुवर्णपदक**
- डॉ. महेंद्र ढोरे, प्राचार्य, शिवाजी विज्ञान महाविद्यालय, नागपूर

**प्राचार्य श्री बलराज अहेर स्मृती सुवर्ण पदक**
- श्री. प्रदीप बिनीवाले (वर्ग १)

**शताब्दी महोत्सव सुवर्ण पदक**
१) डॉ. नितीन डोंगरवार, विभाग प्रमुख,
२)श्री. वसीम अहमद (वर्ग १)
३) श्री. प्रवीण गोतमारे (वर्ग २),
४) श्री. राजेन्द्र बालपांडे (वर्ग ३),
५) श्री. दर्पण गजभिये (वर्ग ४)

**आदर्श अधिकारी पुरस्कार**
१) डॉ. रमण मदने (वर्ग १),
२) श्री. गणेश कुमकुमवार (वर्ग २)

**आदर्श शिक्षकेतर कर्मचारी पुरस्कार**
१) श्री. प्रदीप घ्यार
२) श्री. अरूण हट्टेवार
३) श्री. विलास घोडे
४) श्री. भास्कर शेंडे

**उत्कृष्ट प्राचार्य**
डॉ. देवेंद्र एस. भोंगाडे, जीवन विकास महाविद्यालय, देवग्राम, ता. नरखेड जि. नागपूर

**उत्कृष्ट शिक्षक**
१) डॉ. प्रमोद खेडेकर, औषधी निर्माण शास्त्र विभाग.
२) डॉ. ईश्वर के. सोमनाथे, विद्या विकास कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय समुद्रपूर वर्धा.

**उत्कृष्ट संशोधक**
१) डॉ. रविन एन. जुगादे, रसायनशास्त्र विभाग राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शैक्षणिक विभाग
२) डॉ. रतिराम गो. चौधरी, सेठ केसरीमल पोरवाल कॉलेज, कामठी जि. नागपूर संलग्नित महाविद्यालयातून

**उत्कृष्ट लेखक**
डॉ. सत्यप्रकाश एम. निकोसे, ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

**उत्कृष्ट राष्ट्रीय छात्रसेना कॅडेट पुरस्कार**
१) श्री. साहिल भिमराव खेलकर, जी. एस. कॉमर्स कॉलेज, वर्धा.
२) कु. आरजु समिर खान पठान, जी. एस. कॉमर्स कॉलेज, वर्धा.

**उत्कृष्ट विद्यार्थी पुरस्कार**
१) श्री. विशाल राजकुमार खर्चवाल, शिवाजी सायन्स कॉलेज, नागपूर.
२) कु. अनुश्का नाग (महिला प्रवर्ग), हिस्लॉप कॉलेज, नागपूर.

**उत्कृष्ट सांस्कृतिक उपक्रमपटू पुरस्कार**
१) श्री. आशुतोष अजय तिवारी, आर. एस. मुंडले धरमपेठ आर्टस अॅन्ड कामर्स कॉलेज, नागपूर,
२) कु. अश्लेषा राजेश खंते (महिला प्रवर्ग), नबिरा महाविद्यालय, काटोल.

### उत्कृष्ट राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमपटू पुरस्कार

१) श्री. मनिष प्रमेलाल कडुकर, (पुरुष प्रवर्ग), विज्ञान संस्था, नागपूर,
२) कु. पृथ्वी अनिल राउत, (महिला प्रवर्ग), विज्ञान संस्था नागपूर.

### शासकीय अधिकारी

१) श्रीमती प्रियदर्शनी बोरकर, तत्कालीन तहसीलदार, नागपूर (शहर) व वर्तमान तहसीलदार हिंगणा नागपूर (शहर),
२) श्री. राजेश आनंदराव देठे, मंडळ अधिकारी, तहसीलदार नागपूर (शहर) कार्यालय,
३) ॲड. प्रमोद उपाध्याय, विद्यापीठ अधिवक्ता

### विद्यापीठ आंतर -महाविद्यालयीन वार्षिकांक स्पर्धा

१) लक्ष्मीनारायण इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ - दि क्लॉक टॉक्स,
२) हिस्लॉप कॉलेज, टेम्पल रोड, सिव्हिल लाईन नागपूर - दी हिस्लोपीएन,
३) कमला नेहरू महाविद्यालय, सक्करदरा, नागपूर – कमलगंधा,
४) बॅरी. शेषराव वानखेडे कला व वाणिज्य महाविद्यालय, खापरखेडा जि. नागपूर –कुसुमगंध,
५) यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लाखांदूर जी. भंडारा – यशवंत,
६) गोविंदराम सेकसरिया वाणिज्य महाविद्यालय, वर्धा – अर्थसंदेश,
७) श्री संत गाडगेबाबा हिंदी महाविद्यालय भुसावळ जी. जळगाव – मानस

## शताब्दी महोत्सव पुरस्कार वितरण समारंभातील क्षणचित्रे


















राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ


राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ




राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ


































शिक्षक दिनानिमित्त


राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
शिक्षक दिनानिमित्त


शिक्षक दिनानिमित्त


शिक्षक दिनानिमित्त




शिक्षक दिनानिमित्त


राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
शिक्षक दिनानिमित्त


शिक्षक दिनानिमित्त


शिक्षक दिनानिमित्त


शिक्षक दिनानिमित्त


















- अध्यक्ष -
श्री. रमेश बैस
- सन्माननीय अतिथी -
मा. श्री. विकास एस. सिरपूरकर
डॉ. संजय दुधे
- विनीत -
डॉ. राजू हिवसे
सोमवार, दिनांक ४ सप्टेंबर, २०२३

# राज्य क्रीडा महोत्सव स्पर्धा ३ डिसेंबरपासून रातुम नागपूर विद्यापीठाकडे पाच स्पर्धांचे यजमानपद



राज्यपाल कार्यालयाच्या पुढाकाराने दरवर्षीप्रमाणे यंदाही राज्य क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. यंदाचे यजमानपद राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठासह डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉलॉजी विद्यापीठ, लोनेरे भुषविणार आहे. नागपुरात ३ डिसेंबरपासून या क्रीडा महोत्सवाला प्रारंभ होणार आहे. नागपूर विद्यापीठ पाच क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणार आहे.

राज्यपालांचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेत काही दिवसांपूर्वी झालेल्या बैठकीत महिला गटातील नऊ क्रीडा प्रकारांच्या स्पर्धांचे यजमानपद रातुम नागपूर विद्यापीठाकडे तर मुलांच्या गटातील स्पर्धांचे यजनमान डॉ. आंबेडकर टेक्नॉलॉजी विद्यापीठाकडे देण्यात आले होते. मात्र डॉ. आंबेडकर विद्यापीठाकडे संपूर्ण खेळांच्या मैदानांची तसेच बॅडमिंटन कोर्टची उपलब्धता नसल्याचे जाहीर केले. परिणामी मुलामुलींच्या गटात कबड्डी, खोखो, फुटबॉल आणि बुद्धिबळ या चार स्पर्धांचे आयोजन हे विद्यापीठ करणार आहे. तर रातुम नागपूर विद्यापीठ मुलामुलींच्या ॲथलेटिक्स, बास्केटबॉल, टेबलटेनिस, व्हॉलीबॉल, बॅडमिंटन या पाच क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणार आहे.

नागपूरातील क्रीडा स्पर्धांचे आयोजन ३ ते ७ डिसेंबरदरम्यान करण्यात येणार आहे. तर १० ते १४ डिसेंबरदरम्यान डॉ. आंबेडकर टेक्नॉ. विद्यापीठात उर्वरीत क्रीडा स्पर्धांचे आयोजन होणार आहे. शताब्दी महोत्सवानिमित्त या स्पर्धा आयोजित करण्याचा मान नागपूर विद्यापीठाला तिसऱ्यांदा मिळाला आहे. याबद्दल विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांनी आनंद व्यक्त केला आहे. तसेच विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या मार्गदर्शनात आणि प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे व कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या नेतृत्वात या स्पर्धांचे आयोजन करण्यात येईल अशी माहिती डॉ. शरद सूर्यवंशी यांनी दिली.

या क्रीडा महोत्सवात नागपूर विद्यापीठासह राज्यातील तब्बल २१ विद्यापीठाचे खेळाडू सहभागी होणार आहे. यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर टेक्नॉ. विद्यापीठ राजगड, डॉ. बालासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, डॉ. होमीभाभा राज्य विद्यापीठ मुंबई, गोंडवाना विद्यापीठा, गडचिरोली, हैदराबाद सिंध नॅशनल कॉलेजिएकट विद्यापीठ, मुंबई, केकेकेएस विद्यापीठ, रामटेके, महाराष्ट्र ॲग्रीकल्चरल ॲंड फिशरीज सायंस विद्यापीठ, नागपूर, महाराष्ट्र युनि. ऑफ हेल्थ सायंसेन, नाशिक, म. फुले कृषी विद्यापीठ, राहूरी, मराठवाडा ॲग्रीक्लचरल विद्यापीठ, परभणी, नॉर्थ महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, पंजाबराव कृषी विद्यापीठ, अकोला, रातुम नागपूर विद्यापीठ, एसएनडीटी वुमेन्स विद्यापीठ, मुंबई, एसआरटीएम विद्यापीठ, नांदेड, संत गाडगेबाबा महाराज अमरावती विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर, सोलापूर विद्यापीठ, युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र ओपन विद्यापीठ, नाशिक यांचा समावेश आहे.

## नागपूर विद्यापीठाकडे तिसऱ्यांदा यजमानपद

रातुम नागपूर विद्यापीठ यंदा राज्य क्रीडा महोत्सवाचे यजमानपद भुषवित आहे. या स्पर्धांचे यजमानपद भुषविण्याचे नागपूर विद्यापीठाचे तिसरे वर्ष होय. पहिल्यांदा १९९९ मध्ये नागपूर विद्यापीठाकडे या स्पर्धेची जबाबदारी मिळाली होती. यानंतर २०१२ मध्ये नागपूर विद्यापीठाने दुसऱ्यांदा यजमानपद भुषविले, आणि २०२३ मध्ये तिसऱ्यांदा या स्पर्धा आयोजनाचा मान नागपूर विद्यापीठाला मिळाला आहे.




## शिक्षकांनी गुरु बनण्याचा प्रयत्न करावा - कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात शिक्षक दिन कार्यक्रम



शिक्षकामुळे एखाद्याचे आयुष्य बदलून जाते. त्यानंतर तो व्यक्ती त्या शिक्षकालाच गुरु मानतो. त्यामुळे प्रत्येक शिक्षकाने गुरु बनण्याचा प्रयत्न करावा, असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी केले. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात शिक्षक दिन म्हणून मंगळवार, दिनांक ५ सप्टेंबर २०२३ रोजी साजरी करण्यात आली. यावेळी अध्यक्षीय भाषण करताना कुलगुरू बोलत होते. यावेळी मंचकावर प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे व कुलसचिव डॉ. राजू हिवसे उपस्थित होते.



प्रत्येकाच्या आयुष्यात घर ही पहिली शाळा तर माता-पिता हे प्रथम शिक्षक असतात. माता पिता निस्वार्थ भावनेने जबाबदारी म्हणून मुलांना शिक्षण देतात. मात्र, आज घरात उत्तम शिक्षण मिळताना दिसत नाही. त्यामुळे मुलांच्या आयुष्याचे अपेक्षित परिणाम मिळताना दिसत नाही. शिवाय शिक्षकांवर देखील अनेक जबाबदाऱ्या आल्या आहे. परिणाम स्वरूप नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात वैश्विक मानवी मूल्यांचे शिक्षण देण्याची गरज भासत असल्याचे कुलगुरू डॉ. चौधरी पुढे बोलताना म्हणाले. मानवी मूल्यांचे शिक्षण, जबाबदारीची जाणीव आदी शिक्षण घरापासूनच सुरू झाले पाहिजे. योग्य माणूस घडविण्याची अधिक क्षमता कुटुंबामधील सदस्यांमध्ये असते. चांगला समाज घडविण्यात शिक्षकांची मोठी जबाबदारी असल्याचे भान आपण ठेवावे असे कुलगुरू पुढे बोलताना म्हणाले. या कार्यक्रमामध्ये जगातील २ टक्के संशोधकांच्या यादीमध्ये समावेश झाल्याने डॉ. संजय ढोबळे व डॉ. भारत भानवसे यांचा कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या शुभहस्ते शाल, श्रीफळ व ग्रामगीता देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्र-कलगुरु डॉ. संजय दुधे यांनी स्पर्धेच्या युगामध्ये आई व शिक्षकांची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांच्या मागणीनुसार परीक्षांचे निकाल वेळेवर लावल्याचे देखील डॉ. दुधे यांनी यावेळी सांगितले. पुरस्कार प्राप्त दोन्ही शिक्षकांचे त्यांनी अभिनंदन केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. अमृता इंदूरकर यांनी केले तर उपस्थितांचे आभार कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी मानले. कार्यक्रमाला विविध प्राधिकारणी सदस्य, विविध विभागांचे विभाग प्रमुख, शिक्षक, अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माननीय उपराष्ट्रपती श्री जगदीप धनखड यांच्या हस्ते वृक्षारोपण



विद्यापीठ शताब्दी महोत्सव समारंभ कार्यक्रमात सहभागी होत असताना भारताचे माननीय उपराष्ट्रपती श्री जगदीप धनखड यांच्या हस्ते सुरेश भट सभागृह परिसरात विद्यापीठाच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी माननीय राज्यपाल श्री रमेश बैस, केंद्रीय मंत्री श्री नितीन गडकरी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्यासह अन्य उपस्थित होते.



## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील २ शास्त्रज्ञ जगातील टॉप २ टक्के शास्त्रज्ञांच्या यादीत कुलगुरूंनी केला डॉ. संजय ढोबळे व डॉ. भारत भानवसे यांचा सत्कार

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील २ शिक्षकांचा टॉप २ टक्के शास्त्रज्ञांच्या यादीत समावेश करण्यात आला आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा बहुमान वाढविल्याने माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी भौतिकशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. संजय जानराव ढोबळे आणि लक्ष्मीनारायण इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मधील रसायन अभियांत्रिकी विभागातील प्राध्यापक डॉ. भारत ए. भानवसे यांचा सत्कार केला. जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील कुलगुरू कक्षात शुक्रवार, दिनांक १ सप्टेंबर २०२३ रोजी हा सत्कार करण्यात आला.

भौतिकशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. संजय जानराव ढोबळे आणि लक्ष्मीनारायण इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मधील रसायन अभियांत्रिकी विभागातील प्राध्यापक डॉ. भारत ए. भानवसे यांना स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या टॉप 2% शास्त्रज्ञांच्या यादीत घोषित करण्यात आले आहे. शास्त्रज्ञांचे २२ वैज्ञानिक क्षेत्र आणि १७६ उप-क्षेत्रांमध्ये वर्गीकरण केले आहे. सी-स्कोअर (स्वयं-उद्धरणांसह आणि त्याशिवाय) किंवा उप-क्षेत्रात २ % किंवा त्याहून अधिक टक्केवारी रँकद्वारे जागतिक स्तरावरील शीर्ष १ लाख शास्त्रज्ञांवर ही निवड आधारित आहे. डॉ. संजय जे. ढोबळे हे भौतिकशास्त्र, नॅनो मटेरियल, ल्युमिनेसन्स या क्षेत्रातील प्रसिद्ध संशोधक आहेत आणि सॉलिड स्टेट लाइटिंग, एलईडी आधारित प्रकाशयोजना, थर्मोल्युमिनेसेन्स डॉसिमेट्री आणि सोलर सेल यांसारख्या विविध संशोधन क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांनी उच्च प्रभाव घटकांच्या सायन्स साईटेशन इंडेक्स (SCI) / स्कोपस (SCOPUS) अनुक्रमित जर्नल्समध्ये ८८८ शोधनिबंध प्रकाशित केले आहेत. ५३ पेटंट मंजूर/फाइल केले आहेत. २९ पुस्तके लिखित/संपादित केली आहेत. एल्सेव्हियर, स्प्रिंगर, सीआरसी प्रेस इत्यादींनी प्रकाशित केलेल्या संपादित पुस्तकांमधील १०५ पुस्तक प्रकरणे आणि ७४ आचार्य पदवी शोधकर्त्यांना मार्गदर्शन केले आहे.

डॉ. भरत ए. भानवसे हे लक्ष्मीनारायण इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या केमिकल अभियांत्रिकी विभागामध्ये प्राध्यापक आणि प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. ते सांडपाणी प्रक्रिया, घनकचरा प्रक्रिया, नॅनोमटेरिअल्स सिंथेसिस, प्रक्रिया तीव्रता, मायक्रोफ्लुइडिक्स, नॅनोफ्ल्युइड्ससाठी पोकळ्या निर्माण करणारी प्रक्रियांवर आधारित आहेत. त्यांनी उच्च प्रभाव घटकांच्या सायन्स साईटेशन इंडेक्स (SCI) / स्कोपस (SCOPUS) अनुक्रमित जर्नल्समध्ये १०३ शोधनिबंध प्रकाशित केले आहेत. १० पुस्तके लिखित/संपादित केली आहेत. एल्सेव्हियर, स्प्रिंगर, सीआरसी प्रेस इत्यादींनी प्रकाशित केलेल्या संपादित पुस्तकांमधील ५२ पुस्तक प्रकरणे प्रकाशित केली आहेत आणि १० पेटंट दाखल केले आहेत, त्यापैकी ०३ मंजूर आहेत. लक्ष्मीनारायण इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, नागपूरच्या केमिकल इंजिनीअरिंग विभागाला एनबीए मान्यता मिळवून देण्यात डॉ. भारत ए. भानवसे यांनी केलेले संशोधनाचे योगदान कौतुकास्पद होते. केलेल्या कामाच्या आधारे ते स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीने घोषित केलेल्या टॉप २ % शास्त्रज्ञांमध्ये सूचीबद्ध आहेत. केलेल्या कामामुळे NAAC ग्रेड प्राप्त करण्यात मदत झाली आणि विद्यापीठातील संशोधन वातावरणाचे पालनपोषण करण्यात मदत झाली. यावेळी माननीय कुलगुरू डॉ. सुभाष आर.चौधरी, माननीय प्र-कुलगुरू डॉ. संजय एस. दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, लक्ष्मीनारायण इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, नागपूरचे संचालक डॉ. आर.बी. मानकर, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. ओ. पी. चिमणकर यांनी दोन्ही प्राध्यापकांचे अभिनंदन केले.

## भारतीय संस्कृतीत पोषण आहाराची सांगड - सौ. कांचन गडकरी यांचे प्रतिपादन
## विद्यापीठात न्यूट्रिशन सोसायटी ऑफ इंडियाचे १९ वी राष्ट्रीय वैज्ञानिक संमेलन




**भारतीय संस्कृतीत उत्तम आरोग्यासाठी पोषण आहाराची योग्य सांगड घातली असल्याचे प्रतिपादन सौ. कांचन गडकरी यांनी केले. न्यूट्रिशन सोसायटी ऑफ इंडियाचे १९ राष्ट्रीय वैज्ञानिक संमेलन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील डॉ. ए. के. डोरले सभागृहात शनिवार, दिनांक २ सप्टेंबर २०२३ रोजी पार पडले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा औषधी निर्माणशास्त्र विभाग, सदाबाई रायसोनी महिला महाविद्यालय नागपूर व कम्युनिटी कॉलेज ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च खडगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय वैज्ञानिक संमेलनाचा समारोप करताना सौ. गडकरी मार्गदर्शन करीत होत्या.**

मानवी जीवनात आहाराचे मोठे महत्त्व आहे. योग्य आहारावर आपले जीवन अवलंबून आहे. मानवी शरीराला कोणत्या काळात कोणते न्यूट्रिशन (योग्य पोषण आहार) हवे याचे योग्य संयोजन भारतीय संस्कृतीमधील सण, उत्सव आणि शेतीमध्ये असल्याचे सौ. गडकरी म्हणाल्या. आपल्याकडे जानेवारी महिन्यामध्ये साखर आणि गुळाचे उत्पादन होते आणि त्याच दरम्यान संक्रांती सण देखील येतो. या सणांमध्ये आपण भरपूर प्रमाणात तिळगुळ म्हणजेच न्यूट्रिशन घेतो. असे वेगवेगळे न्यूट्रिशन आपण प्रत्येक सणाला विविध पदार्थांच्या माध्यमातून घेत असल्याचे त्यांनी सांगितले. आपली जेवणाची थाळी परिपूर्ण होती. मात्र, पाश्चिमात्य अनुकरण करून आपण आपलेच न्यूट्रिशन विसरलो आहे. आपल्याकडे असलेले तृणधान्य आपल्या पूर्वजांनी खाल्ले. ८० वर्षांपेक्षा जास्त वय झाले असताना देखील त्यांची प्रकृती ठणठणीत दिसून येते. त्या उलट नवीन पिढीमध्ये १० पैकी ८ जणांमध्ये डायबिटीज तर २ टक्के नागरिकांमध्ये कॅन्सर आढळून येत असल्याचे त्यांनी सांगितले. पश्चिमात्य आहार पद्धतीचा अवलंब केल्याने त्याचा दुष्परिणाम दिसून येत आहे. पाश्चिमात्य आहार तज्ज्ञांचे विचार ऐकूण आपण खाणेच कमी करतो. मात्र, भरपूर खा, भरपूर मेहनत करा, स्वस्थ रहा मस्त रहा असे सौ. गडकरी म्हणाल्या. रोज एक चमचा तूप खाल्ले पाहिजे, असे आयुर्वेद सांगते. आयुर्वेदाने दूर्धर कॅन्सर




देखील बरा झाल्याचे उदाहरण त्यांनी दिले. गीतेमध्ये देखील आहार शास्त्रावर संपूर्ण एक अध्याय आहे. त्यामुळे तेव्हापासूनच भारतामध्ये आहार शास्त्राचे महत्व आहे. आपली ही भारतीय संस्कृती, परंपरेचा अभ्यास होणे गरजेचे असल्याचे त्या म्हणाल्या. आपण राहत असलेल्या परिसरातील शेतीत पिकणारे धान्य, तृणधान्य, भाजीपाला व फळे खाल्याने आरोग्य चांगले राहते, असे त्या म्हणाल्या. सोबतच महिला सक्षमीकरण, त्यांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देणे आदी विविध माहिती त्यांनी त्यांच्या भाषणातून दिली.



औषधी निर्माणशास्त्र विभागाच्या डॉ. ए.के. डोरले सभागृहात सकाळी ९.३० वाजता उद्‌घाटन समारंभ पार पडला. उद्‌घाटन समारंभाला इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ नागपूरचे वरिष्ठ प्रादेशिक संचालक डॉ. पी. शिवस्वरूप, डॉ. ए.एन. राधा, डॉ. सुब्बाराव गवारावरपू, डॉ. दिनेश कुमार, डॉ. सबिहा वली, डॉ. वर्षा, डॉ. अमिना वली यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी औषधी निर्माणशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रमोद खेडेकर होते. उद्‌घाटनिय कार्यक्रमाचे संचालन डॉ. श्रीलक्ष्मी पोटलूरी व परविंदर बमराह यांनी केले. समारोपीय कार्यक्रमाला सेवासदन शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष तथा मातृ सेवा संघ महालच्या अध्यक्ष सौ. कांचन नितीन गडकरी यांची प्रमुख उपस्थिती होती. माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या वतीने विज्ञान व तंत्रज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी यावेळी उपस्थित होते. यावेळी अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी यांनी न्यूट्रिशन या विषयावर २ क्रेडिटचा अभ्यासक्रम सुरू करता येईल असे सांगितले. सोबतच न्यूट्रिशन अभ्यासक्रमाची रचना तयार करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी केल्या. त्यांनी त्यांच्या भाषणातून न्यूट्रिशनचे महत्व अधोरेखित केले.

उद्‌घाटनिय सत्रानंतर भारतीयांना जीवनसत्वांची आवश्यकता या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. सत्राचे अध्यक्षस्थान डॉ. निशिकांत राऊत यांनी भूषविले. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ न्यूट्रिशन- आयसीएमआरचे माजी संचालक डॉ. शशिकिरण यांच्या **'पोषणतत्वे एक गुंतवणूक'** या विषयावर डॉ. सुब्बाराव एम. गवारावरपू यांनी प्रेझेंटेशन सादर केले. त्यानंतर न्यूट्रिशन इन्फॉर्मेशन कम्युनिकेशन अँड हेल्थ एज्युकेशन (एनआयसीएचई) -आयसीएमआर हैदराबादचे डॉ. वर्षा, डॉ. नदीम खान यांनी मार्गदर्शन केले. संचालन परविंदर बमराह यांनी केले. शास्त्रज्ञ डॉ. दिनेश कुमार यांनी मार्गदर्शन केले. पोषण दक्षता या विषयावरील चर्चासत्रात डॉ. दादासाहेब कोकरे, प्रो. सुमिता जैन, श्रीमती परविंदर बमराह व पीकेव्ही येथील डॉ. आर. बी. घोराळे भाग घेतला. दिवसभर चालणाऱ्या विविध चर्चासत्रात डॉ. डी. एम. पंचभाई, डॉ. संजीव पाटणकर, डॉ. वर्षा, प्रो. सबिहा वली, डॉ. रिता भार्गव, श्रीमती प्रज्ञा बागलकोटे, प्रो. ए. एन. राधा, डॉ. प्रकाश ईटणकर, डॉ. प्रतिमा शास्त्री, डॉ. स्मिता वैद्य, डॉ. रिता वडेतवार, डॉ. सोनल वानखेडे, डॉ. एम.जी. भोतमांगे, प्रो. निलिमा जोशी सहभागी झाले. तत्पूर्वी घेण्यात आलेल्या पेपर प्रेझेंटेशन स्पर्धेत प्रथम क्रमांक तेजस्वरी टेंभुर्णे हिने तर द्वितीय क्रमांक मृण्मयी जोगळेकर हिने पटकावला. समारोपीय कार्यक्रमाचे संचालन डॉ. सकीना रघीब यांनी केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने औषधी निर्माण शास्त्र विभागातील शिक्षक, विद्यार्थी, न्यूट्रिशन सोसायटी ऑफ इंडियाचे सदस्य उपस्थित होते.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात उद्यान निर्मिती छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समितीचे वृक्षारोपण









राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवन परिसरात उद्यान निर्मिती केली जात आहे. या उद्यान निर्मिती कार्यास सुरुवात करीत शनिवार, दिनांक २ सप्टेंबर २०२३ रोजी वृक्षारोपण करण्यात आले. विद्यापीठाचा उद्यान विभाग व छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समितीच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

जमनालाल बजाज प्रशासकीय भवन परिसरात तयार होत असलेल्या उद्यान निर्माण कार्यास माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी व छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समितीचे अध्यक्ष राजे मुधोजी भोसले यांच्या शुभहस्ते सुरुवात करण्यात आली. त्यानंतर उद्यान परिसरात माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समितीचे अध्यक्ष राजे मुधोजी भोसले, समितीचे उपाध्यक्ष शेखर सावरबांधे, सचिव मंगेश डुके, कौशल्य व व्यवसाय विकास संचालक प्रकाश देशमाने यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी वित्त व लेखा अधिकारी श्री. हरीश पालीवाल, समिती सदस्य तथा विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. मंगेश पाठक, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोपानदेव पिसे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. प्रवीणा खोब्रागडे, विद्यापीठ उद्यान अधीक्षक प्रवीण गोतमारे, रोजगार व प्रशिक्षण अधिकारी डॉ. भूषण महाजन, रवींद्र शेरे, राष्ट्रगन चंद्रशेखर, मोहन जाधव, सुभाष मंडलेकर यांच्यासह अन्य उपस्थित होते.




# शिक्षण मानवी जीवनाला सार्थक बनविते - अजय पाठक

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या हिंदी विभागात शिक्षक दिवस कार्यक्रम

शिक्षण ही चांगला मनुष्य निर्माण करण्याची प्रक्रिया आहे. शिक्षण मानवी जीवनाला सार्थक बनविते. शिक्षणा शिवाय व्यक्तित्वाचा विकास शक्य नसल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी मुंबईचे सदस्य श्री. अजय पाठक यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या हिंदी विभागात मंगळवार, दिनांक ५ सप्टेंबर २०२३ रोजी शिक्षक दिनाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात होते मार्गदर्शन करीत होते.

शिक्षक हे राष्ट्र निर्माता आहेत. देशाच्या चरित्र निर्माणा- मध्ये त्यांचे मोठे योगदान असते. प्रगत देशाची निर्मिती त्यांचे शिक्षक आणि शिक्षण संस्थांवर अवलंबून असते. शिक्षणामुळेच प्राचीन काळात भारताची गणना विश्वगुरूच्या रूपात झाल्याचे पाठक यांनी पुढे बोलताना सांगितले. विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पांडे यांनी अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करताना मनुष्य जीवनात प्रत्येक दिवस काही ना काही शिकवित असल्याचे सांगितले. शिकणे आणि शिकविण्याचा भाव आपणास जबाबदार आणि दायित्वपूर्ण बनवीत असल्याचे ते म्हणाले. यावेळी सहयोगी प्राध्यापक डॉ. संतोष गिरहे यांनी शिक्षकांच्या आचरणातूनच विद्यार्थी शिकत असल्याचे सांगितले. आज आपणास ध्येयनिष्ठ आणि उच्च मानवी मूल्यांची आवश्यकता असल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थिनी कु. पूजा चतुर्वेदी हिने केले. की. गुंजन चंदेल या विद्यार्थिनीने गीत तर आशिष उपाध्याय याने स्वरचित कविता प्रस्तुत केली. यश वाघ याने शिक्षणासंदर्भात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे विचार, मिनी पांडे ने स्वामी विवेकानंद यांचे विचार, अंकिता शुक्ला ने महात्मा गांधी यांचे विचार तर ज्ञानेश्वर भेलकर याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व्यक्त केले. या कार्यक्रमात सेट नेट परीक्षेत उत्तीर्ण झालेले विभागातील माजी विद्यार्थी दिशांत पाटील, विनय उपाध्याय व स्नेहा वानखेडे यांचा प्रमुख अतिथींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला शिक्षक डॉ. सुमित सिंह, डॉ. कुंजन लिल्हारे, डॉ. एकादशी जैतवार, प्रा. जागृती सिंह, प्रा. दिशांत पाटील, प्रा. रूपाली हिवसे, प्रा. दामोदर द्विवेदी यांच्यासह विद्यार्थ्यांचा उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन अतिशय जैन तथा माधुरी कावडे या विद्यार्थ्यांनी केले तर आभार डॉ. लखेश्वर चंद्रवंशी यांनी मानले.



## 'माझी माती माझा देश' अभियानाला बनवू लोक चळवळ

### रासेयो राज्य सल्लागार समिती सदस्य डॉ. राजेश पांडे यांचे आवाहन

### विद्यापीठात अमृतकलश संकलन नियोजन कार्यशाळा

भारत भूमीच्या स्वातंत्र्यासाठी असंख्य शहिदांनी बलिदान दिले. त्या शहिदांना वंदन करणे तसेच भूमीला नमन करण्यासाठी सरकारने 'माझी माती माझा देश' अभियान सुरू केले आहे. या 'माझी माती माझा देश' अभियानाला लोकचळवळ बनवूया, असे आवाहन राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्य सल्लागार समिती सदस्य डॉ. राजेंद्र पांडे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसरातील दीक्षांत सभागृहात राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय कक्ष मुंबई, रासेयो कार्यक्रम अधिकारी व कलश संकलन नियोजन कार्यशाळा बुधवार, दिनांक ६ सप्टेंबर २०२३ रोजी पार पडली. यावेळी डॉ. पांडे मार्गदर्शन करीत होते.

यावेळी व्यासपीठावर रासेयो राज्य सल्लागार समिती सदस्य डॉ. राजेंद्र पांडे, रासेयो राज्य सल्लागार समिती सदस्य डॉ. सतिश चाफले, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी रासेयो संचालक डॉ. संजय चाकणे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य श्री. वामनराव तुर्के, व्यवस्थापन परिषद सदस्य श्री. अजय चव्हाण, विद्यापीठ रासेयो संचालक डॉ. सोपानदेव पिसे, अधिसभा सदस्य सर्वश्री डॉ. कुमुद रंजन, श्री. नीरज जावडे, शुभांगी नक्षीने, डॉ. किशोर इंगळे, प्रथमेश फुलेकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रवी मोर उपस्थित होते. डॉ. राजेंद्र पांडे पुढे बोलताना म्हणाले की, देशाच्या स्वातंत्र्यासाठी अनेकांनी प्राणाची आहुती दिली, ज्या मातीसाठी बलिदान दिले. त्या मातीचे ऋण फेडण्यासाठी केंद्र सरकार संपूर्ण देशात 'माझी माती माझा देश' अभियान राबवित आहे. देशातील प्रत्येक नागरिकांमध्ये देशभक्ती जागविण्यासाठी हा उपक्रम राबविला जात आहे. २०४७ मध्ये भारताला जगातील पहिल्या क्रमांकाचा देश बनविण्याचा संकल्प शहिदांना व मातीला वंदन करून करावयाचा असल्याचे डॉ. पांडे म्हणाले. देशातील प्रत्येक गावातून आलेल्या मातीतून दिल्ली येथील कर्तव्य पथावर अमृत वाटिका तयार केली जाणार आहे. ३० ऑक्टोबरला ७५ हजार विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत वाटीकेत वृक्ष लागवड केली जाणार असल्याचे डॉ. पांडे यांनी सांगितले. या अभियानात विद्यापीठ परिक्षेत्रातील प्रत्येक महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच नागरिकांना सहभागी करून घेण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी डॉ. संजय चाकणे यांनी अभियानाबाबत माहिती देताना संपूर्ण देशातून ७४ हजार कलश एकत्र केले जाणार असल्याचे सांगितले. पंचप्राण प्रतिज्ञा घेताना त्याची सेल्फी काढून अपलोड करण्याचे आवाहन त्यांनी केले. शिवाय कार्यशाळेत सेल्फी कशी काढावी याबाबत त्यांनी प्रात्यक्षिक करून दाखविले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना रासेयो संचालक डॉ. सोपानदेव पिसे यांनी माझी माती माझा देश अभियान अंतर्गत वृक्षदिंडी पंचप्राण प्रतिज्ञा आदी विविध कार्यक्रमांचे आयोजन केल्याची माहिती दिली. सोबतच 'माझी माती माझा देश' अभियानात प्रत्येक महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना व नागरिकांना सहभागी करून घेण्याचे आवाहन कार्यक्रम अधिकारी यांना केले. अधिसभा सदस्य शुभांगी नक्षीने यांनी डॉ. राजेश पांडे यांचा परिचय करून दिला. विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी अमृतकलशामध्ये माती टाकून माती प्रती कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे संचालन रासेयो संचालक डॉ. सोपानदेव पिसे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.



# राणी रासमणी यांनी जनतेमध्ये राष्ट्राभिमान जागविला

## माजी महापौर दयाशंकर तिवारी यांचे प्रतिपादन

## शताब्दी वर्षाच्या निमित्ताने सेवादल महिला महाविद्यालयात व्याख्यान

पारतंत्र्याच्या काळात राणी रासमणी यांनी जनतेमध्ये राष्ट्राभिमान जागविला, असे प्रतिपादन माजी महापौर श्री. दयाशंकर तिवारी यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ शताब्दी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने १०० व्याख्यानमाला आयोजित केल्या जात आहे. शताब्दी व्याख्यानमालेतील प्रथम पुष्प सक्करदरा चौकातील सेवादल महिला महाविद्यालयात गुरुवार, दिनांक ३१ ऑगस्ट २०२३ रोजी गुंफण्यात आले. यावेळी श्री. तिवारी मार्गदर्शन करीत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी होते. व्याख्याते म्हणून नागपूरचे माजी महापौर श्री. दयाशंकर तिवारी, प्रमुख अतिथी म्हणून सेवादल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. संजय शेंडे, विद्यापीठाचे माजी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय वाटमोडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रवीण चरडे व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी पुढे मार्गदर्शन करताना श्री. दयाशंकर तिवारी यांनी राणी रासमणी यांच्याबाबत माहिती दिली. राणी रासमणी ह्या कोलकाता येथील असून अशिक्षित असताना देखील त्यांनी अनेक प्रगल्भ योजना राबविल्या. या योजनांच्या माध्यमातून जनमाणसांना राणी रासमणी आधार देत होत्या, असे तिवारी म्हणाले. पारतंत्र्याच्या काळात इंग्रजी राजवटीला त्यांनी अनेकदा झुकविले. महाविद्यालय स्थापन केले, मंदिरांची निर्मिती केली. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रामध्ये राणी रासमणी यांनी मोठे कार्य केले. सोबतच जनतेमध्ये राष्ट्रभिमान निर्माण केला. राणी रासमणी यांच्या जीवनातील विविध दृष्टांत तिवारी यांनी सांगितले. त्यांच्या पराक्रमाचा इतिहास देशातील नव्या पिढीला होणे गरजेचे आहे. त्यापासून देशवाशियांना प्रेरणा मिळेल असा, आशावाद श्री. तिवारी यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना माजी अधिष्ठाता डॉ. दत्तात्रय वाटमोडे यांनी विद्यापीठाच्या शताब्दी महोत्सवी वर्षानिमित्त शंभर व्याख्यानमाला आयोजित केल्या जात असल्याचे सांगितले. या व्याख्यानमालेची सुरुवात सेवादल महिला महाविद्यालयात आयोजित प्रथम पुष्पाने होत असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषण करताना माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी व्याख्यान आयोजित करण्यामागील पार्श्वभूमी सांगितली. शताब्दी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने विद्यापीठाच्या 'रिचींग टू अनरीच्ड' अभियानाबाबत माहिती दिली. विद्यापीठ परिक्षेत्रातील ४ ही जिल्ह्यांमध्ये ही व्याख्यानमाला आयोजित केल्या जाणार आहेत. महाविद्यालयीन विद्यार्थीच नव्हे तर प्रत्येक समाज घटकाला या व्याख्यानमालेचा लाभ व्हावा, असे डॉ. चौधरी म्हणाले. विद्यापीठाच्या वतीने राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहिती त्यांनी यावेळी दिली. सोबतच भविष्यकालीन वाटचाल आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये अधोरेखित केली. सेवादल शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. संजय शेंडे यांनी मार्गदर्शन करताना विवेकाचे मानवी जीवनातील महत्त्व विद्यार्थ्यांनी आत्मसात करून जीवनात विवेकवाद स्वीकारावा, असे सांगितले. विवेकवाद स्वीकारून आयुष्य निर्विघ्नपणे पार पाडावे, असे श्री. शेंडे म्हणाले. कार्यक्रमाचे संचालन करीत आभार डॉ. रिता दांडेकर यांनी मानले. कार्यक्रमाला शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.





## खेलो इंडिया केंद्राच्या निवड चाचणीला खेळाडूंचा उत्स्फूर्त प्रतिसाद
## मैदानावर ३५८ खेळाडूंनी आपल्या कौशल्याचे केले सादरीकरण

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठांतर्गत सुरु असलेल्या खेलो इंडिया केंद्राच्या निवड चाचणीसाठी पहिल्या दिवशी तब्बल ३५८ खेळाडूंनी आपली उपस्थित दर्शवित या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दर्शविला आहे. या निवड चाचणीत पहिल्या दिवशी खेळाडूंच्या तंदुरुस्तीची परीक्षा घेण्यात आली. तर ६ सप्टेंबर रोजी खेळाडूंमधील कौशल्याचे मूल्यांकन करण्यात आले.

खेलो इंडिया केंद्रात प्रशिक्षण घेण्याची संधी नवीन खेळाडूंना मिळावी या उद्देशाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा विभागाच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन केले होते. ॲथलेटिक्स, बॅडमिंटन, बास्केटबॉल आणि हँडबाल या खेळासाठी रवी नगरातील विद्यापीठाच्या मैदानावर ही निवड चाचणी घेण्यात आली. दोन्ही दिवशी घेण्यात आलेल्या चाचणीत १० ते १८ वयोगटातील खेळाडूंनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शविली. यावेळी पहिल्या दिवशी खेळाडूंची तंदुरुस्तीची परीक्षा घेण्यात आली. यावेळी खेळाडूंना शटल रन, ३० मीटर फ्लाय, मेडिसीन बॉल थ्रो, उंची आणि वजन याची तपासणी करण्यात आली. दुसऱ्या दिवशी स्टँडिंग ब्रॉड जंप, फॉरवर्ड बेंड अँड रिच, ६००, ८०० मीटर धावणे यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे दुसऱ्या दिवशी चार ही क्रीडा प्रकारातील खेळाडूंना त्यांच्या क्रीडा प्रकाराबाबत किती ज्ञान आहे याची तपासणी करण्यात आली. प्रत्यक्षात तो क्रीडा प्रकार खेळाडूंना यावेळी खेळायला लावण्यात आला. साई केंद्राचे औरंगाबादचे वरिष्ठ हॉलीबॉल प्रशिक्षक अश्फाक खलेडी आणि वरिष्ठ हॅण्डबॉल प्रशिक्षक आशिष बॅनर्जी यांनी खेळाडूंचे परीक्षण केले. निवड चाचणीच्या यशस्वीतेसाठी नागपूर जिल्हा ॲथलेटिक्स संघटना आणि बॅडमिंटन, बास्केटबॉल व हँडबॉल खेळाच्या पंचानी यात मोलाचे योगदान दिले. खेलो इंडिया केंद्रात एकूण शंभर नवीन खेळाडूंना संधी मिळणार आहे. यात बॅडमिंटनमध्ये १६, हँडबॉलमध्ये ३०, ॲथलेटिक्ससाठी २५ आणि बास्केटबॉल खेळासाठी २९ खेळाडूंची निवड करण्यात येणार असून निवड झालेल्या खेळाडूंची घोषणा लवकरच होणार असल्याची माहिती राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांनी दिली.







## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात राजे उमाजी नाईक जयंती

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात राजे उमाजी नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली उपकुलसचिव श्री. प्रदीप बिनीवाले यांनी विद्यापीठाच्या वतीने राजे उमाजी नाईक यांना हारार्पण करीत आदरांजली वाहिली. यावेळी जनसंपर्क अधिकारी प्रेमदास वाडकर, स्वप्निल मोडक, कवडू भोयर, अनिल खरे, मोरेश्वर उमरेडकर, योगेश केवटे, रुपेश आत्राम, कार्तिक हरडे यांच्यासह अन्य कर्मचारी उपस्थित होते.

# ट्रायबल टुरिझमला बळकटी गरजेचे - डॉ. कोरेटी

### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्रवास व पर्यटन विभागाचे आयोजन




जगातील एकूण लोकसंख्येच्या पाच टक्के लोक आदिवासी आहेत. ते भारतासह जपान, न्यूझीलंड, रशिया, इंग्लंड, कॅनडा, मसाई, सोमालया, चीन व तिबेट यासह विविध ९० देशात राहत असून त्यांचे ५२ प्रकारचे विविध समुदाय आहेत. त्यांच्या संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी ट्रायबल टुरिझमला बळकटी प्राप्त करून देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन मानव विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्रवास व पर्यटन विभागाने आयोजित केलेल्या अतिथी व्याख्यानात 'जमाती पर्यटन, संधी आणि आव्हाने' या विषयावर ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रवास व पर्यटन विभागाचे प्रमुख डॉ. प्रियदर्शी खोब्रागडे होते. याप्रसंगी बोलताना डॉ. शामराव कोरेटी म्हणाले की, भारतामध्ये ११ ते १२ कोटी लोक आदिवासी आहेत. ते भारतातील विविध प्रांतात राहतात. बस्तर, छत्तीसगढ, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, झारखंड, ओरिसा आदी भागात ते मोठ्या प्रमाणात आहेत. जंगल, मैदान, वाळवंट या ठिकाणी ते आजही तग धरून आहेत. हा समाज पर्यावरणाला कोणत्याही प्रकारची हानी पोहोचवत नाही. तर पर्यावरणाचे संतुलन राखतो. त्यांची स्वतःची संस्कृती आहे. चंद्रपूर, शिरपूर, बल्लारपूर येथे गोंड राजांची राजधानी होती. १७ व्या शतकापर्यंत ते उच्च शिखरावर होते. त्यांचा वैभवशाली इतिहास होता. परंतु आक्रमकांसमोर ते फार काळ टिकू शकले नाही. परिणामी त्यांनी जंगलाचा आश्रय घेतला. त्यांना जंगले, झाडे-झुडपे यांचा चांगला अभ्यास आहे. त्यामुळे त्यांनी आयुर्वेदिक औषधीची प्रयोगशाळा जंगलामध्ये निर्माण करून त्याच औषधीच्या बळावर आपला उपचार करून घेतात. जंगलाचे संवर्धन कसे करावे हे त्यांच्याकडून शिकता येते. भौगोलिक नैसर्गिक वातावरण यामध्ये ते मिसळून गेले आहेत. आदिवासी लोकांना लाकडी काम, धातू काम, औषधी याची चांगली जाणीव आहे. जंगलातील झाडांच्या मुळापासून वाहणारे पाणी हे औषधीयुक्त आहे. हे आता संपूर्ण जगाला दिसून आलेले आहेत. ते पाणी पितात. कमीत कमी संसाधनाच्या माध्यमातून जगण्याची कला आदिवासी समाजाने आत्मसात केली आहे. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. प्रियदर्शी खोब्रागडे यांनी विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन रामदास बागडे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय नरेश मेश्राम तर आभार दीपक उके यांनी करून दिला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. अरविंद उपासनी, भाग्यश्री हिरादेवे, नेहा दुबे, प्रा, शोभना मेश्राम, प्रा. परिमल सुराडकर, प्रा. मंजुषा डोंगरे, प्रा. अमरदीप बारसागडे, जयंत साठे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

**देशोन्नती**

# प्रियांशू, मुग्धा, सम्राट, नाविका अव्वल

**नागपूर** ■ राष्ट्रीय क्रीडादिनानिमित्त नागपूर जिल्हा ॲथलेटिक्स संघटना, नागपूर विद्यापीठाचे खेलो इंडिया प्रशिक्षण केंद्र, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व रातुम नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाच्या संयुक्त विद्यमाने किड्स ट्रायथ्लॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विविध वयोगटात प्रियांशू परतेकी, मुग्धा तायवाडे, सम्राट नेताराव, नाविका मोटघरे यांनी अव्वल स्थान प्राप्त केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मैदानावर झालेल्या ५० मीटर धावणे, गोळाफेक आणि भालाफेक स्पर्धेत खेळाडू सहभागी झाले होते. यामध्ये १२ वर्षांखालील मुलींच्या गटात सक्सेस पाईटच्या नाविका मोटघरे ही अव्वल, द्वितीय क्रमांक खुशी गुमगांवकरने, तर तिसरा क्रमांक सोनम पुडकेने आणि चवथे स्थान डीपीएसच्या स्वरा हिवसेने प्राप्त केले. मुलांच्या गटात एसओएस हुडकेश्वरच्या सम्राट नेतारावने अव्वल स्थान प्राप्त केले. द्वितीय भावेश अवतरे, तर तृतीय क्रमांक अविरद मानधनाने १२७१ गुणांसह प्राप्त केले. स्पर्धेतील विजेत्यांना रातुम विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांच्या हस्ते तसेच विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांच्या हस्ते पुरस्कृत करण्यात आले. संचालन अर्चना कोट्टेवार यांनी तर आभार रामचंद्र वाणी यांनी मानले.

Deshonnati Edition

**TheHitavada**

Nagpur City Line | 2023-09-01 | Page- 3
ehitavada.com

# LIT is now officially LITU, a varsity

■ **Staff Reporter**

LAXMINARAYAN Institute of Technology (LIT) which is part of the Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University (RTMNU) is now Laxminarayan Innovation Technological University (LITU), in consonance with the National Education Policy 2020 and the policies of the State Government to create Centres of Excellence in niche areas to promote research, innovation, infrastructure and incubation for overall growth of the State.

The State has a long history of creating new universities by bifurcating existing well-established universities. Some of the original universities meant while underwent name changes, including expansion of original names to honour well-known social reformers, poets and saints. Very recently the College of Engineering Pune (COEP), a government college (Autonomous), was carved out of the Savitribai Phule Pune University (SPPU) into a separate State University.

The Departments of Microbiology, Biochemistry, and Rajiv Gandhi Biotechnology Centre run M Sc courses and PhD research programmes are under the administrative and academic control of the RTMNU.

However, as per MOU, these will now be part of the LIT University. These departments were established on the LIT campus. The proposed LIT University has planned to start B Tech course in Pharmaceutical Engineering. In addition to Chemical Engineering subjects, this course includes courses from Microbiology, Biochemistry, and Bio-Technology streams, for example, Pharmaceutical and Biochemistry Analysis, Chemistry of Natural Products, Medicinal Natural Products Laboratory, Pharmaceutical Biotechnology, Biotechnology Laboratory, Bio-pharmaceutics and Pharmacokinetics, Drug Metabolism, Molecular Biology, and Clinical Research Management.

LIAAA office-bearers Madhav Labhe, Ajay Deshpande and Advisor Mohan Pande have expressed happiness over the new development.

Powered by iDocuments

# शताब्दी महोत्सव पुरस्कार वितरण सोमवारी

**राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते वितरण**



**म. टा. प्रतिनिधी**, नागपूर

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्यावतीने शिक्षक दिनानिमित्त शताब्दी महोत्सव पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन सोमवार, ४ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता करण्यात आले आहे. सिव्हिल लाइन्स येथील डॉ. वसंतराव देशपांडे स्मृती सभागृहात आयोजित समारंभात विद्यापीठाचे कुलपती आणि राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण होईल. समारंभाला प्रमुख अतिथी म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती विकास सिरपूरकर उपस्थित राहतील. यावेळी मंचावर कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांची उपस्थिती राहील. विविध पुरस्कारांसह विद्यापीठाच्या जमिनीवरील अतिक्रमण हटविण्यास मदत केलेल्या शासकीय अधिकाऱ्यांचाही यावेळी सत्कार केला जाईल. तसेच विद्यापीठ आंतरमहाविद्यालयीन वार्षिकांक स्पर्धेचे पुरस्कार वितरित केले जातील. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी केले आहे.

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जीवन साधना पुरस्कार**
- डॉ. एच.एफ. दागीनावाला, नागपूर
- प्रा. श्री. सुरेश देशमुख, वर्धा
- डॉ. निरुपमा देशपांडे, अमरावती
- शिवकिसन अग्रवाल, नागपूर
- हरिश्चंद्र बोरकर, भंडारा

**शताब्दी महोत्सव सुवर्ण पदक**
- डॉ. नितीन डोंगरवार, विभागप्रमुख
- वसीम अहमद (वर्ग १)
- प्रवीण गोतमारे (वर्ग २)
- राजेंद्र बालपांडे (वर्ग ३)
- दर्पण गजभिये (वर्ग ४)

- **शिक्षण संस्था पुरस्कार** : श्री नागपूर गुजराती मंडळ, नागपूर.
- **डॉ. आर. कृष्णकुमार सुवर्णपदक** : डॉ. महेंद्र ढोरे, प्राचार्य, शिवाजी विज्ञान महाविद्यालय, नागपूर
- **प्राचार्य श्री बलराज अहेर स्मृती सुवर्ण पदक** : प्रदीप बिनीवाले

**bhaskarhindi.com**

# विवि : अगले शैक्षणिक सत्र से लागू होगा नया पाठ्यक्रम

■ बीएससी, बीसीए, बी.कॉम बीबीए में नई शिक्षा नीति

भास्कर प्रतिनिधि | नागपुर



राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज नागपुर विवि ने अपने यहां नई शिक्षा नीति को लागू करने को लेकर शुक्रवार को एक महत्वपूर्ण घोषणा की है। अगले शैक्षणिक सत्र से नया पाठ्यक्रम लागू होगा। विवि ने स्पष्ट किया है कि नई राष्ट्रीय शिक्षा नीति-2020 के अनुसार उसने बीएससी, बीसीए, बी.कॉम, बीबीए, बीएससी फायनांस, बीए मास कम्यूनिकेशन जैसे पाठ्यक्रम और परीक्षा प्रणाली बीते दिनों तैयार की थी, जो विवि की वेबसाइट पर उपलब्ध है।

## बदलाव का विकल्प खुला

शुक्रवार को जारी अधिसूचना में विवि ने स्पष्ट किया है कि राज्य सरकार ने इस पाठ्यक्रम को शैक्षणिक सत्र 2024-25 से लागू करने के निर्देश दिए हैं। आगामी कुछ दिनों में अगर राज्य सरकार इसमें कोई बदलाव करती है, तो विवि उसे अपनाएगा, अन्यथा इसी पाठ्यक्रम को अगले सत्र से पूरी तरह लागू कर दिया जाएगा। गौरतलब है कि बीते 5 जून को ही नागपुर विवि ने अपने सभी प्रथम वर्ष पाठ्यक्रमों में नई शिक्षा नीति लागू करने की घोषणा कर दी थी, लेकिन इसके बाद राज्य उच्च शिक्षा मंत्री चंद्रकांत पाटील ने घोषणा कर दी कि नई शिक्षा नीति पर एक राज्य स्तरीय समिति बनेगी, जिसमें विविध विश्वविद्यालयों के प्रतिनिधि मिल कर सामयिक दिशा-निर्देश बनाएंगे, उसके बाद ही इस नीति को लागू किया जाएगा।

## निर्णय पर रोक लगी थी

शिक्षा मंत्री की घोषणा के तुरंत बाद नागपुर विवि ने अपने निर्णय पर रोक लगा कर इस शैक्षणिक सत्र को पुराने प्रारूप के अनुसार ही चलाने का फैसला लिया था। तबसे शिक्षा वर्ग की नजर नागपुर विश्वविद्यालय की ओर टिकी हुई थी कि विवि अब नई शिक्षा नीति कब से लागू करेगी। आखिरकार शुक्रवार को विवि ने अपनी मंशा स्पष्ट कर दी है।

**लोकमत**

संजय ढोबळे, भारत भानवसे स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या टॉप शास्त्रज्ञांच्या यादीत

# शाब्बास! नागपूर विद्यापीठाचे दोन प्राध्यापक जगाच्या पटलावर

लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर** : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. संजय जानराव ढोबळे आणि लक्ष्मीनारायण इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे रसायन अभियांत्रिकी विभागातील प्राध्यापक डॉ. भारत ए. भानवसे यांना अमेरिकेतील स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या टॉप २ टक्के शास्त्रज्ञांच्या यादीत स्थान मिळाले आहे.



जगातील शास्त्रज्ञांचे २२ वैज्ञानिक क्षेत्र आणि १७६ उपक्षेत्रांमध्ये वर्गीकरण केले आहे. सी-स्कोअर किंवा उपक्षेत्रात २ टक्के किंवा त्याहून अधिक टक्केवारी रँकद्वारे जागतिक स्तरावरील शीर्ष १ लाख शास्त्रज्ञांवर ही निवड आधारित आहे. कुलगुरू डॉ. सुभाष आर. चौधरी यांनी या दोन्ही प्राध्यापकांचे अभिनंदन केले आहे.

## ढोबळे यांचे ८८८ शोधनिबंध व ५३ पेटंट



डॉ. संजय जे. ढोबळे हे भौतिकशास्त्र, नॅनो मटेरियल, ल्युमिनेसन्स या क्षेत्रातील संशोधक आहेत. सॉलिड स्टेट लाइटिंग, एलईडी आधारित प्रकाशयोजना, थर्मोल्युमिनेसेन्स डॉसिमेट्री आणि सोलर सेल यांसारख्या विविध संशोधन क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांनी उच्च प्रभाव घटकांच्या सायन्स साईटेशन इंडेक्स (एसीआय)/ स्कोपस अनुक्रमित जर्नल्समध्ये ८८८ शोधनिबंध प्रकाशित केले आहेत. ५३ पेटंट मंजूर/फाइल केले आहेत. याशिवाय त्यांनी २९ पुस्तकांचे लेखन आणि संपादन केली आहे. एल्सेव्हियर, स्प्रिंगर, सीआरसी प्रेस इत्यादींनी प्रकाशित केलेल्या संपादित पुस्तकांमधील १०५ पुस्तक प्रकरणे आणि ७४ आचार्य पदवी शोधकर्त्यांना मार्गदर्शन केले आहे.

## भानवसे यांचे १०३ शोधनिबंध, ३ पेटंट



डॉ. भारत ए. भानवसे हे लक्ष्मीनारायण इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या (एलआयटी) केमिकल अभियांत्रिकी विभागामध्ये प्राध्यापक आणि प्रमुख म्हणून कार्यरत आहेत. ते सांडपाणी प्रक्रिया, घनकचरा प्रक्रिया, नॅनोमटेरिअल्स सिंथेसिस, प्रक्रिया तीव्रता, मायक्रोफ्लुइडिक्स, नॅनोफ्ल्युइड्ससाठी पोकळ्या निर्माण करणाऱ्या प्रक्रियांवर आधारित आहेत. त्यांनी उच्च प्रभाव घटकांच्या सायन्स साईटेशन इंडेक्स / स्कोपस अनुक्रमित जर्नल्समध्ये १०३ शोधनिबंध प्रकाशित केले आहेत. १० पुस्तके लिखित/संपादित केली आहेत. एल्सेव्हियर, स्प्रिंगर, सीआरसी प्रेस इत्यादींनी प्रकाशित केलेल्या संपादित पुस्तकांमधील ५२ पुस्तक प्रकरणे प्रकाशित केली आहेत. त्यांनी १० पेटंट दाखल केले आहेत. त्यापैकी ०३ मंजूर आहेत.

Hello Nagpur
Page No. 3 Sep 02, 2023
Powered by: erelego.com

# शॉर्ट फिल्म स्पर्धा में 1 लाख के पुरस्कार बांटेगा विवि

■ विद्यार्थी और अन्य नागरिक ले सकेंगे हिस्सा
■ प्रतियोगिता में भाग लेने कोई शुल्क नहीं



भास्कर प्रतिनिधि | नागपुर

अपना शताब्दी महोत्सव मना रहे राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय ने शुक्रवार को एक शॉर्ट फिल्म प्रतियोगिता की घोषणा की, जिसमें विजेताओं को विवि कुल 1 लाख रुपए के पुरस्कार प्रदान करेगा। इस प्रतियोगिता में नागपुर विवि के विविध पीजी विभागों और संलग्नित कॉलेजों के विद्यार्थियों के अलावा नागपुर, गोंदिया, भंडारा और वर्धा निवासी नागरिक अकेले या 3 से 5 के समूह...

प्रतियोगिता में हिस्सा लेने के लिए विवि की अधिकृत वेबसाइट और सोशल मीडिया हैंडल पर जा कर 31 अक्टूबर तक पंजीयन कराया जा सकता है। 30 नवंबर तक प्रतिभागियों को 100 शब्दों के सार के साथ अपनी शॉर्ट फिल्म विवि को प्रस्तुत करनी होगी।

**ये है 11 विषय** : प्रतिभागियों को युवा की सफलता की कहानी शिक्षा/करियर, नागरिक जिम्मेदारी, पर्यावरण संरक्षण, देश/समाज के लिए योगदान, संस्कृति एवं परम्पराओं को संजोना, नारी सशक्तिकरण/लैंगिक समता, राष्ट्रीय अखंडता/सांप्रदायिक सौहार्द, कौशल विकास के लाभ, ग्रामीण विकास, सामाजिक जागरूकता और दया विषय पर 3 से 5 मिनट की फिल्म बनानी होगी। प्रथम पुरस्कार को 25 ...

**लोकमत समाचार**

# न्यूट्रिशन सोसाइटी ऑफ इंडिया का आज राष्ट्रीय सम्मेलन

**नागपुर** : न्यूट्रिशन सोसाइटी ऑफ इंडिया का 19वां राष्ट्रीय सम्मेलन राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय में शनिवार 2 सितंबर को आयोजित किया जा रहा है. इस राष्ट्रीय सम्मेलन का आयोजन राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय फार्मास्यूटिकल इंजीनियरिंग विभाग, सदावाई रायसोनी महिला कॉलेज नागपुर और कम्युनिटी कॉलेज ऑफ टेक्नोलॉजी एंड रिसर्च खड़गांव के संयुक्त तत्वावधान में आयोजित किया जा रहा है. उद्घाटन विभाग के डॉ. एके डोरले सभागृह में सुबह 9.30 बजे होगा. जहां एनआईएन-आईसीएमआर के संचालक और न्यूट्रिशन सोसाइटी ऑफ इंडिया के अध्यक्ष डॉ. आर. डी. हेमलता, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विश्वविद्यालय नागपुर के वरिष्ठ क्षेत्रीय संचालक डॉ. पी. शिवस्वरूप, जी. एच. रायसोनी विश्वविद्यालय अमरावती के कुलपति डॉ. विनायक देशपांडे मुख्य रूप से उपस्थित रहेंगे. कार्यक्रम की अध्यक्षता फार्मास्यूटिकल इंजीनियरिंग विभाग के प्रमुख डॉ. प्रमोद खेड़ेकर करेंगे. इस सेमिनार में देश के प्रमुख विशेषज्ञ अपने विचार रखेंगे. कार्यक्रम में सेवा सदन शिक्षण संस्थान की अध्यक्ष एवं मातृ सेवा संघ महल की अध्यक्ष कांचन नितिन गडकरी भी मौजूद रहेंगी.

Apna Nagpur
Page No. 7 Sep 02, 2023
Powered by: erelego.com

**लोकमत समाचार**

# शाब्बाश! विश्व पटल पर नागपुर विवि के दो प्रोफेसर

लोकमत समाचार सेवा

